# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर  **P.S.(ठाणे):** आजरा

**Year (वर्ष):** 2023

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0219

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):21/10/2023 02:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 20/10/2023

**Date To ( दिनांक पर्यत):** 20/10/2023

**Time From (वेळेपासून):** 15:12 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:14 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date (दिनांक ):** 21/10/2023  **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No. (नोंद क्र.):** 008

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/10/2023 02:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

आग्रेय, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,भुमिअभिलेक कार्यालय, आजरा, आजरा,आजरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

Total value
(चोरीस गेलेल्या
6,000.00
11.Inque
(इन

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अक्षय भाऊसो जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1994

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 768/3 प्लट नं8, हनुमाननगर, पाचगाव रोड,करवीर,आजरा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चिमणे,आजरा,आजरा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निवास वसंत पाटील | | | 1. सामंत कम्पलेक्स, आजरा, आजरा,आजरा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु.च्या चलनी नोटा | 6,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

6,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी. अक्षय भाऊसो जाधव वय - 29 वर्षे, व्यवसाय-टुअर्स अॅन्ड ट्रव्हेल्स, रा.768/3 प्लॉट नं.8, हनुमाननगर पाचगांव रोड, ता. करवीर, जि. कोल्हापूर मो. नं. 8482961407 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 19/10/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार फोनव्दारे सागितली की, माझी आजी नामे सौ. षांताबाई बाबुराव पाटील हिचे मामा विठोबा तातोबा तारळेकर रा. चिमणे ता. आजरा जि. कोल्हापुर यांना आपत्य नसल्याने त्यांनी मृत्यूपत्र तयार करुन त्यांचे मालकीचे चिमणे येथील घर व षेत जमीन माझी आई सौ छाया भाऊसो जाधव हिचे नावे केलेली होती. आजीचे मामा व त्यांची पहिली पत्नी सौ.हौसाबाई हे दोघेही मयत झालेनंतर मामा यांची दुसरी पत्नी षिरमा उर्फ श्रीमंती यांनी आमचे अपरोक्ष मामाच्या सर्व मालमत्तेवर वारस म्हणून नाव लावल्याचे समजलेनंतर माझ्या आईने अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, कोल्हापूर यांचेकडे श्रीमती षिरमा हिचे नाव कमी करुन मृत्यूपत्राच्या आधारे वारस म्हणून तिचे नाव नोंद करण्याबाबत दावा दाखल केला होता. त्या दाव्याची सुनावणी सुरू असतानाच माझी आई मयत झाली. तिच्या नंतर वारस म्हणून माझे वडील, मी व भाऊ असे आम्ही सदर दाव्यामध्ये अपिलदार झालो. सदर दाव्याचा निकाल आमचे नावे लावण्याचा आदेश जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, कोल्हापूर यांनी दिला. मुपो चिमणे ता. आजरा न.भ.क्र. 373 या मिळकतीस आमची नावे प्रॉपर्टी कार्डवर नोंद होण्याकामी माझे वडीलांनी उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, आजरा ता.आजरा, जि.कोल्हापुर यांचेकडे दि.14.08.2023 रोजी तसेच दि.12.09.2023 रोजी अर्ज केला होता. त्याप्रमाणे आमचे नावाची नोंद झाली किंवा नाही हे पाहण्याकरीता मी दि.10/10/2023 रोजी दुपारी 3.00 वा. सुमारास भुमी अभिलेख कार्यालय, आजरा येथे जावून पाटील, पद-निमतानदार यांनी तीघांची नावाची नोंद करण्याकरीता त्यांनी माझेकडे 6,000 रू. मागणी केली आहे. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे असे सांगून परत आलो होतो. त्यांनतर दि. 18/10/2023 रोजी सां.6.30 वा.सु मो.नं.9420973356 यावर माझा मो.नं.8482961407 वरून फोन केला परंतु त्यांनी फोन घेतला नाही. त्यांनतर दुस-या दिवषी सकाळी 11.00 वा.सु निवास पाटील यांनी माझ्या मोबाईलवर फोन करून मला दि.20/10/2023 रोजी दु.3.00 वा.नंतर त्यांचे कार्यालयामध्ये येण्यास सांगितले असून त्याप्रमाणे मी त्यांना भेटायला जाणार आहे. तरी त्यांचेवर कायदेषीर कारवाई होणेकरीता तक्रार सांगितली त्यानंतर नाळे साहेबांनी त्यांचे अधिनिश्ठ पोलीस निरीक्षक साळुंके हे माझे तक्रारीवर कारवाई करतील असे सांगितले. त्यानुसार साळुंके साहेबांनी मला ते पंच सापळा पथकासह आजरा परिसरात दि.20/10/2023 रोजी दु. 2.00 वाजताच्या सुमारास येत असल्याचे सांगून तेथे मला येणेबाबत सांगितले.

आज दि.20/10/2023 रोजी मी साळुंके साहेबांच्या संर्पकात होतो. त्यांनी मला आजरा येथे पोहेचल्यानंतर मला त्यांनी आजरा रामतिर्थ मंदीराजवळ येण्यास सांगितले त्यानुसार मी साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी पोहचलो. साहेबांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. त्यानंतर साळुंके साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सागुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन निवास पाटील यांच्याकडे लाच मागणीच्या अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.01 यांना निवास पाटील यांना भेटणेकरीता पाठविले. मी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, आजरा ता.आजरा, जि.कोल्हापूर येथे जावून पाटील यांची भेट घेतली त्यावेळी आमचेत माझे कामाबाबत चर्चा झाली त्यावेळी पाटील यांनी वारसा हक्काने आमची नावे नोंदविणेबाबत जो आदेष दिला त्याप्रमाणे नावे नोंद करणेसाठी माझ्याकडे 6,000/- रुपयाची मागणी केली मी त्यांना पैसे घेवून येतो असे सांगून मी व पंच नं.01 तेथुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर साळुंके साहेबांनी सापळा कारवाई सुरू करून कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर

अं ॅथ्रासिन लावलेले 6,000/- रूपये माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवुन मला योग्य त्या सुचना देवून पाटील यांना भेटण्याकरीता जाण्यास सांगितले. त्यानंतर रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिले. त्यानंतर मी व पंच नं. 01 असे माझ्या मारुती 800 एम-एच-04-डी.एन.2411 मधून निघालो सोबतच माझे पाठोपाठ सापळा पथक मध्यवर्ती षासकिय इमारत कार्यालय, आजरा येथे आले. मी मध्यवर्ती षासकिय इमारत येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात निवास पाटील यांना भेटलो. त्यावेळी पाटील हे ऑफिसचे बाहेर असलेल्या जिन्याच्या बाजूस येवून प्रॉपर्टी कार्डवर नाव नों द करुन कधी मिळणार याबाबत विचारणा करुन मी त्यांना तुम्ही सांगितल्याप्रमाणे सहा देतो असे म्हणुन त्यांचेकडे त्यां नी मागणी केलेले 6000/- रुपये दिले त्यावेळी त्यांनी ते पैसे उजव्या हातात घेवून बर..बर असे बोलून त्यावेळी मी त्यांना मोजून घ्या... सगळ... असे म्हणालो त्यावेळी पाटील यांनी पैसे त्यांचे षर्टाच्या डाव्या खिशात ठेवले. त्यावेळी मी पाटील यांनी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा करताच साळुंके साहेब आणि त्यांचा स्टाफ तेथे आला त्यावेळी सापळा पथकाने लाच स्विकारलेल्या रक्कमेसह पाटील यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही आजरा पोलीस स्टेषन, कोल्हापूर येथे येवुन पुर्ण करण्यात आली.

तरी वारसा हक्काने मिळालेल्या दाव्याचा निकाल आमचे बाजूने लागला असून त्याप्रमाणे आमची नावे प्रॉपर्टी कार्डावर नों द करुन प्रॉपर्टी कार्ड देण्यासाठी निवास पाटील, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापुर यांनी माझेकडे 6,000/-रूपयांची अप्रामाणिकपणे मागणी करून माझ्याकडुन त्यांनी बेकायदेशीरपणे 6,000/- रूपये लाच स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी निवास वसंत पाटील, वय 43 वर्षे, पद-निमतानदार वर्ग -3, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, आजरा ता. आजरा जि.कोल्हापूर रा.सामंत कॉम्पलेक्स, प्रा.आ.केंद्र रोड, आजरा मुळ रा. मु.पो. कसबा वाळवे ता. राधानगरी, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Sunil Keshav Harugade(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



14 Signature/T complainant (तक्रारदार

15.

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**
Akshay.C

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**
**Name (नाव):** Sunil Keshav Haruga
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**